**अधिक विषय क्रमांक १.**

**विचारात घेण्यात आले :-** आयुक्तांचे दि. २० ऑक्टोबर २००९ चे पत्र क्र. उपउअ/वृमआ/१०३०:-

" **विषय** : महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (दि. ३ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारित) मधील कलम ८ अन्वये तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत विद्यमान अर्ज प्रक्रिया शुल्क व अनामत रकमेत वाढ करणेबाबत.

**संदर्भ** : वृक्ष प्राधिकरणाचा ठराव क्रमांक १७६, दि. ७.१०.२००६.

"उपरोक्त विषयासंदर्भात महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व संवर्धन अधिनियम,१९७५ (दि. ३ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारीत) मधील कलम ८ (२) व ८(३) क मधील तरतुदीनुसार विविध विकासकामात येणारी/अडथळा करणारी झाडे काढण्याबाबतचे प्रस्ताव पक्षकरांकडून वृक्ष प्राधिकरणाकडे प्राप्त झाल्यानंतर विद्यमान कार्यप्रणालीचा अवलंब करुन जसे स्थानिक वर्तमानपत्रात, बाधित होणाऱ्या किंवा कापण्यात येणाऱ्या झाडांची माहिती प्रसिध्द करणे व झाडांवर नोटीस लावणे व त्यानंतर प्रस्ताव वृक्ष प्राधिकरणाच्या होणाऱ्या मासिक सभेत मंजुरीकरिता सादर करणे, इत्यादी अर्जावर सर्व प्रक्रिया करण्यासाठी अर्ज प्रक्रिया शुल्क एकूण रु.४,५००/- ठराव क्र. १७६, दि. ७.१०.२००६ अन्वये वृक्ष प्राधिकरणाने दिलेल्या मान्यतेनुसार स्वीकारण्यात येतात. त्याचप्रमाणे वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकीत प्रस्ताव संमत झाल्यानंतर काढण्यास व पुनर्रोपित करण्यास प्रस्तावित केलेल्या प्रत्येक झाडामागे रु.४,०००/- एवढी अनामत रक्कम स्वीकारण्यात येते. तसेच शासकीय खात्यांमार्फत विद्यमान प्रक्रिया शुल्क रु.१०००/- एवढी सुरक्षा आकारण्यात येते जेणेकरुन पक्षकार सदर अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करेल, जसे तोडण्यास/कापण्यास परवानगी दिलेल्या एका झाडाच्या बदल्यात नवीन २ झाडे लावील व वृक्ष प्राधिकरणाच्या मानंकानुसार प्रत्येक १०० चौ.मी. क्षेत्रफळात २ झाडे व मनोरंजन मैदानामध्ये १०० चौ.मी. क्षेत्रफळात ५ झाडे याप्रमाणे झाडे लावील व झाडांचे संरक्षण व जतन योग्यरित्या करेल. सदर अनामत रक्कम, परवानगीच्या अटी शर्तीचे विश्वासार्ह अनुपालन करण्यासाठी सुरक्षा अनामत रक्कम म्हणून स्वीकारण्यात येते.

२. तथापि, झपाटयाने वाढणाऱ्या शहरीकरणाचा विकास लक्षात घेता, तसेच वाढत्या प्रशासकीय खर्चाचा विचार करता झाडे कापणे / पुनर्रोपित करण्याच्या परवानगीचे विश्वासार्ह अटी शर्तीचे पालन करण्यासाठी सध्या स्वीकारण्यात येणारी सुरक्षा अनामत रक्कम सद्य परिस्थितीत विकासकाच्या दृष्टीने नगण्य असल्याने परवानगीच्या अटी/शर्तीचे पालन अपेक्षितरित्या प्रभावीपणे होत नाही. सबब संदर्भित सुरक्षा अनामत रक्कम विद्यमान आकारण्यात येणाऱ्या, झाडे कापण्यासाठी रु.४०००/- वरुन रु. ६०००/- व झाडे पुनर्रोपित करण्यासाठी रु. ४०००/- वरुन रु. १०,०००/- प्रति झाड आकारण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर प्रस्तावित वाढीव सुरक्षा अनामत रक्कम मान्य झाल्यास विकासक, परवानगीच्या अटी व शर्तीचे पालन प्रभावीपणे व कटाक्षाने करतील व जास्तीत जास्त पुनर्रोपणाची झाडे शास्त्रोक्त पध्दतीने व यथायोग्य काळजी घेऊन पुनर्रोपित केली जाऊन त्यांचे जतन व देखभाल चांगल्या प्रकारे केले जाईल व झाडे पुनर्रोपण करणाऱ्या प्रक्रियेकडे दुर्लक्ष करणाऱ्या व झाडांच्या जतन न करणाऱ्या विकासकांवर आळा बसेल व परिस्थिती नियंत्रणात येईल.

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner

३. निसर्गाचा योग्यरित्या समतोल राखण्यासाठी झाडांचे संरक्षण व जतन त्याचप्रमाणे नवीन झाडे लावणे, वृक्ष प्राधिकरणाने झाडे पुनर्रोपित करण्यास परवानगी दिलेल्या झाडांचे योग्य शास्त्रोक्त पध्दतीने काळजीपूर्वक पुनर्रोपण करणे व त्यांची जोपासना करणे फार आवश्यक आहे. तथापि, काही पक्षकारांकडून याची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी म्हणून सदर सुरक्षा अनामत रकमेत वाढ करणे समर्थनीय व संयुक्तिक होईल. तसेच, महापालिकेच्या अनामत रकमेत देखील लक्षणीय वाढ होईल.

४. वरील बाबींचा विचार करता वर उल्लेखित अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याकरिता व शहरीकरणाचा झपाटयाने होणारा विकास लक्षात घेता सध्याचे अर्ज प्रक्रिया शुल्क रु.४,५००/- वरुन रु.६०००/- करण्यास व विद्यमान अनामत रक्कम रु.४०००/- ऐवजी झाड कापण्यास प्रस्तावित केलेल्या झाडामागे रु.६०००/- अनामत रक्कम स्वीकारण्यास व पुनर्रोपित करण्यास प्रस्तावित केलल्या प्रत्येक झाडामागे रु. १०,०००/- पक्षकाराकडून स्वीकारण्यास तसेच शासकीय खात्याकडून प्रति झाडामागे विद्यमान रु. १०००/- ऐवजी रु.२०००/- सुरक्षा अनामत रक्कम आकारण्यास प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर प्रक्रिया शुल्क व सुरक्षित अनामत रक्कम २००६ सालापासून म्हणजेच गेल्या ३ वर्षांपासून सुधारित करण्यात आलेली नाही.

५. सदर प्रस्तावित छाननी शुल्क सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार रु.४,५००/- वरुन रु.६०००/- करण्यास व विद्यमान अनामत रक्कम रु.४०००/- ऐवजी झाड कापण्यास प्रस्तावित केलेल्या झाडामागे रु.६०००/- अनामत रक्कम स्वीकारण्यास व पुनर्रोपित करण्यास प्रस्तावित केलेल्या प्रत्येक झाडामागे विद्यमान रु. ४०००/- वरुन रु. १०,०००/- पक्षकाराकडून स्वीकारण्यास तसेच शासकीय खात्याकडून प्रति झाडामागे विद्यमान रु. १०००/- ऐवजी रु.२०००/- सुरक्षा अनामत रक्कम आकारण्याकरिता [illegible], वृक्ष प्राधिकरण यांची मंजूरी मिळावी.

६. पुनर्रोपण करण्यास परवानगी दिलेल्या झाडांचे पुनर्रोपण तांत्रिकदृष्टया बरोबर होत नाही. तसेच शास्त्रोक्त पध्दतीने होत नाही अशा गंभीर तक्रारी, वृक्ष प्राधिकरण सदस्य व वृत्तपत्रकारांकडून वारंवार येतात. त्यासाठी वृत्तपत्रांत एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट देऊन त्यात पुनर्रोपणात तज्ञ व ज्यांच्याकडे पुनर्रोपणासाठी आवश्यक असलेली सर्व संयंत्रे उपलब्ध आहेत, अशा तज्ञांची सूची बनवून पुनर्रोपणासाठी परवानगी दिलेल्या पक्षकारांना सूची पुरविण्यात येईल व झाडे पुनर्रोपित करण्याची प्रक्रिया तांत्रिक दृष्टया व शास्त्रोक्त पध्दतीने होते की नाही हे पाहणे संदर्भित तज्ञांवर बंधनकारक राहील असे प्रस्तावित करण्यात येत आहेत.

## परिशिष्ट

| अ.क्र. | तपशिल | विद्यमान शुल्क व सुरक्षा अनामत (रुपये) | प्रस्तावित |
|---|---|---|---|
| १. | छाननी शुल्क / अर्ज प्रक्रिया शुल्क | रु.४,५००/- | रु. ६,०००/- |
| २. | वृक्ष कापणी सुरक्षा अनामत रक्कम | रु.४,०००/- | रु. ६,०००/- |
| ३. | वृक्ष पुनर्रोपित सुरक्षा अनामत रक्कम | रु.४,०००/- | रु. १०,०००/- |
| ४. | शासकीय खाते/निमशासकीय खाते | रु.१०००/- | रु. २,०००/- |

Scanned by CamScanner

५३५

(बुधवार, दि. २१ ऑक्टोबर २००९.

वृक्ष प्राधिकरण)

**ठरविण्यात आले :-** " वृक्ष प्राधिकरणाचा दि. ७ ऑक्टोबर २००६ चा ठराव क्र. १७६

**क्रमांक ३०५.** च्या अनुषंगाने आयुक्तांच्या पत्राच्या परिच्छेद ५ व ६ मधील प्रस्ताव **मंजूर.** "

Scanned by CamScanner

Scanned by CamScanner